सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



# मनरेगा कर्मचाऱ्यांचे आंदोलन ग्रामीण रोजगार ठप्प

## ● मजुरांच्या वेतनाचा प्रश्न ऐरणीवर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

मनरेगा अर्थात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत कार्यरत महाराष्ट्र समन्वयक, कार्यक्रम व्यवस्थापक, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी, पॅनल तांत्रिक अधिकारी, डेटा एन्ट्री ऑपरेटर यांच्या संघटनांनी विविध प्रलंबित मागण्यांसाठी तीव्र आंदोलन सुरु केले आहे.

त्यामुळे ग्रामीण भागातील मनरेगाची सर्व कामे ठप्प झाली असून लाखो मजुरांच्या उपजीविकेवर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मनरेगा अंतर्गत कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचारी हे कंत्राटी स्वरुपात



कार्यरत आहेत. इतर योजनांतील कर्मचाऱ्यांप्रमाणे त्यांनाही शासन सेवेत नियमित करण्यात यावे, मनरेगा अंतर्गत सुरु असलेली कथित अनधिकृत व अवैध भरती प्रक्रिया तत्काळ थांबवावी, इतर विभागांप्रमाणे मनरेगा विभागाची स्वतंत्र यंत्रणा उभारुन पदनिहाय आकृतीबंध (कॅडर स्ट्रक्चर) तयार करावा, अशीही मागणी करण्यात आली. राज्य शासनाने सम कक्ष इतर योजनांमधील कर्मचाऱ्यांना शासन सेवेत समाविष्ट करण्याबाबत किंवा त्यांना आवश्यक संरक्षण देण्याबाबत सकारात्मक निर्णय घेतले असतानाही मनरेगा कर्मचाऱ्यांच्या बाबतीत मात्र आजतागायत कोणताही ठोस निर्णय झालेला नाही, असेही सांगण्यात आले.

या आंदोलनाचा थेट फटका ग्रामीण मजुरांना बसत आहे. राज्यभरातील अनेक ठिकाणी कामावर हजर असलेल्या मजुरांची उपस्थिती नोंदवता येत नाही. तांत्रिक अडचणींमुळे हजेरीपत्रके 'झिरो' केली जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. मजुरांचे वेतन अदा होणार नसल्याने मोठे आर्थिक नुकसान होणार आहे. या नुकसानीची जबाबदारी नेमकी कोण घेणार? असा सवालही उपस्थित केला जात आहे.

| आंदोलनाची रुपरेषा | |
|---|---|
| २३ ते २७ जानेवारी | कार्यालयात काळ्या फिती लावून निषेध |
| २७ जानेवारी ते १ फेब्रुवारी | कामबंद व असहकार आंदोलन |
| २ ते ५ फेब्रुवारी | मुंबईतील आझाद मैदान येथे ठिय्या आंदोलन |
| ६ ते १० फेब्रुवारी | साखळी उपोषण |
| ११ फेब्रुवारीपासून | मागण्या मान्य होईपर्यंत आमरण उपोषण, अन्नत्याग आंदोलन |

# एसटी गाड्यांच्या फेऱ्या रद्द; प्रवाशांची होणार गैरसोय

## जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणूक प्रक्रियेसाठी ३५१ एस.टी. बसेस तैनात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ फेब्रुवारी-**

सोलापूर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील स्थानिक एस.टी.बस वाहतुकीवर मोठा परिणाम होणार आहे. शनिवार, दि.७ फेब्रुवारी रोजी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत मतदान होणार आहे. मतदान साहित्य व अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या वाहतुकीसाठी जिल्ह्यात तब्बल ३५१ एसटी बसगाड्या निवडणूक कामासाठी तैनात करण्यात आल्या आहेत. त्यामुळे शुक्रवार, दि.६ आणि शनिवार, दि. ७ या दोन दिवसांत जिल्ह्यातील बहुतांश स्थानिक मार्गांवरील एसटी बससेवा बंद राहणार आहे.

सोलापूर जिल्ह्यात एकूण २ हजार ७५८ मतदान केंद्रे असून, या सर्व ठिकाणी मतदान साहित्य वेळेत पोहोचवणे व कर्मचाऱ्यांची ने-आण करणे ही मोठी जबाबदारी असते. यासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या सोलापूर विभागातील उपलब्ध ५२५ साध्या बसगाड्यांपैकी ३५१ बस निवडणूक प्रक्रियेसाठी वापरण्यात येणार आहेत. परिणामी जिल्ह्यातील गावपातळीवर, तालुका स्तरावरील तसेच काही म ध्यम पल्ल्याच्या मार्गांवरील वाहतूक जवळपास ठप्प होणार आहे.



परिवहन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, निवडणुकीमुळे दोन दिवस जिल्ह्यात अवघ्या दीडशेच्या आसपास बसगाड्या प्रवाशांसाठी उपलब्ध असतील. विशेषतः ग्रामीण भागातील प्रवाशांना याचा मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी प्रवासापूर्वी स्थानकात चौकशी करूनच प्रवास करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. दहावी व बारावीच्या प्रात्यक्षिक परीक्षांसाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांनीही या बदलाची दखल घ्यावी, जेणेकरून परीक्षेला उशीर होणार नाही, असे परिवहन अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, सोलापूर, पुणे महामार्गांवरील बस वाहतूक तुलनेने सुरळीत ठेवण्याचा प्रयत्न केला जाणार असून, मात्र जिल्ह्यातील अंतर्गत मार्गांवर बससेवा बंद राहील.

दि.६ व ७ फेब्रुवारी रोजी निवडणुकीसाठी मोठ्या प्रमाणावर बसगाड्या वापरात येणार आहेत. त्यामुळे या दोन दिवसांत साध्या, मध्यम व लांब पल्ल्याच्या अनेक बससेवा बंद राहतील. रविवार, दि.८ फेब्रुवारी २०२६ पासून नेहमीप्रमाणे सर्व मार्गांवरील बससेवा सुरु करण्यात येईल, असे सोलापूर विभाग नियंत्रक अमोल गोंजारी यांनी सांगितले.

# शालेय पोषण आहाराचे अनुदान रखडले; बचत गटांची आर्थिक कोंडी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ फेब्रुवारी-**

सोलापूर शहरातील शाळांमधील विद्यार्थ्यांना पोषण आहार पुरविण्यासाठी धान्यादी मालाचे अनुदान न मिळाल्याने बचत गटांच्या महिलांची जणू आर्थिक कोंडी करण्यात आल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

महापालिका क्षेत्रातील जिल्हा परिषद व अनुदानित खासगी शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी पोषण आहार शिजवण्याची जबाबदारी महिला बचत गटांकडे देण्यात आलेली आहे. मात्र, शासनाकडून मिळणारे अनुदान वेळेवर न आल्याने बचत गटांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे. अनेक बचत गटांनी उधारीवर धान्य खरेदी करून आहार सुरू ठेवला असून, कर्जाचा डोंगर वाढत चालला आहे.

संजना महिला बचत गटाच्या अध्यक्षा रेखा फत्तेपूरकर यांनी सांगितले की, शहरातील एकूण ४४ महिला बचत गट या योजनेत कार्यरत असून, त्यांचे सुमारे नऊ कोटी रुपयांचे अनुदान थकले आहे. गेल्या आठ ते नऊ म हिन्यांपासून अनुदान थकले आहे. बचत गट चालवणे कठीण झाले असून महिलांना वैयक्तिक कर्ज काढावे लागत आहे. शासनाने तातडीने थकलेला निधी द्यावा. जर लवकरच अनुदान मिळाले नाही, तर पोषण आहार योजना बंद पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## महत्वाचे...

### इंडियन दलित सेनेच्या शहर अध्यक्षपदी प्रा.एजाज कनुळ

**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

इंडियन दलित सेनेच्या सोलापूर शहर अध्यक्षपदी प्राध्यापक एजाज कनुळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय, आंबेडकर पुतळा येथे तातडीची बैठक घेण्यात आली, त्या बैठकीच्या अध्यक्ष स्थानी संघटनेचे संस्थापक



अध्यक्ष देवीदास दुपारगुडे हे होते. बैठकीस संघटनेचे नरेंद्र चव्हाण, जिल्हा सचिव अनुसया दहिहंडे, जिल्हा संपर्क प्रमुख स्वदिप वाघमारे, विलास दुपारगुडे यांची निवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी राहुल गायकवाड, मनोज जगधणे, गौतम शिंगे, आयेशाबी शेख व शहर सचिव पदी सुलोचना बनसोडे, आशा शिंगे, शहर संपर्क प्रमुख पदी अब्दुल हमीद शेख, प्रभाकर गायकवाड, करुणा कांबळे, सोलापूर शहर संघटक पदी प्रभाकर ठेंगील, बंगल बनसोडे, लक्ष्मी जाधव, विठाबाई निकंबे, सुमित्रा बिरुनगी, मुन्याप्पा मरेड्डी, यशोधा सोनवणे यांची तर प्रमुख सल्लागारपदी शशिकुमार सोनवणे, चंद्रकांत वाघमारे, सुहास जोशी, देवानंद सोनवणे यांची एकमताने निवडणूक करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यासमोर संस्थापक अध्यक्ष देविदास दुपारगुडे यांच्या हस्ते नियुक्तीचे पत्र देण्यात आले.

### संत रविदास मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी चंद्रकांत मग्रुमखाने

**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

राष्ट्रीय चर्मकार महासंघ प्रणित संत रविदास मध्यवर्ती जयंती उत्सव मंडळाच्या अध्यक्षपदी चंद्रकांत मग्रुमखाने यांची निवड करण्यात आली. ज्येष्ठ सदस्य दत्ता मस्तूद यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत निवडण्यात आलेले इतर



पदाधिकारी याप्रमाणे; उपाध्यक्ष-शिव टोणपे, बंधू कबाडे, कृष्णा काळे, सचिव-छायाप्पा चव्हाण, सहसचिव-सूर्यकांत व्हनखडे, खजिनदार-राजेंद्र कांबळे. संत रविदास महाराजांची जयंती १५ फेब्रुवारी रोजी साजरी करण्याचे ठरले. राम कबाडे, दत्ता खडतरे, दीपक गवळी यांच्या योगदानातून उपलब्ध झालेले पुतळे विविध मंडळांना देण्याचे ठरले. यावेळी संजय शिंदे, शावरप्पा वाघमारे, चंद्रकला कांबळे, रामचंद्र कबाडे, गणेश तूपसमुद्रे, प्रशांत कांबळे, परशुराम मब्रुखाणे, बाळासाहेब आळसंदे, रोहिदास कांबळे, प्रदीप लांबतुरे, इरेश मब्रूखान, दीपक गवळी, पांडुरंग व्हनकळस, सुहास दळवी, मल्लू मग्रुमखाने, समर्थ क्षीरसागर, रोहिदास व्हनकळस, भगवान वनस्कर, रतन आळसुंदे, योगेश कबाडे उपस्थित होते.

### लाथाबुक्क्यांनी मारहाण

**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

जुना पुणे नाका येथे थांबले असताना दोघांनी मिळून पाण्याचा जगणे व लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याने एका युवकाच्या डोक्यात जखम झाल्याने तो शासकीय रुग्णालयात दाखल झाला. निवृत्ती गायकवाड वय २६ राहणार हनुमान नगर, न्यू बुधवार पेठ सोलापूर हा दि. २ फेब्रुवारी रोजी ७.३० च्या सुमारास शिवशक्ती हॉटेल जुना पुना नाका येथे यश चंडक आणि गणेश चंडक यांनी मिळून पाण्याच्या जगणे व लाथाबुक्याने मारहाण केली. त्याला डोक्यात जखम झाल्याने उपचारास तो स्वतः शासकीय रुग्णालया येथे दाखल झाला, अशी नोंद सिविल पोलीस चौकीत झाली आहे.

# ब्ल्यू लाईन-रेड लाईनशिवाय बांधकामाला परवानगी नाही

## सोलापुरात नदी-नाल्यांच्या नैसर्गिक प्रवाहाला 'कवच'
## यूडीसीपीआर नियमांची कडक अंमलबजावणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ फेब्रुवारी-**

सोलापूर शहरातील पावसाळी पाण्याचा निचरा सुरळीत राहावा आणि नैसर्गिक नदी-नाल्यांच्या प्रवाहावर अतिक्रमण होऊ नये, यासाठी सोलापूर महानगरपालिकेने महत्त्वाचा व दूरगामी निर्णय घेतला आहे. यापुढे यूडीसीपीआर नियम ३.१.१ (ii) नुसारच ले-आऊट मंजुरी व बांधकाम परवानगी देण्यात येणार असून, ब्ल्यु लाईन, रेड लाईन व आपत्ती व्यवस्थापन आराखडा (डीएमपी) यांचे काटेकोर पालन बंधनकारक करण्यात आले आहे.



शहरातील सर्व नैसर्गिक नदी व नाल्यांचे प्रवाह विद्यमान विकास आराखड्यात (डीपी) समाविष्ट करण्यात आले असून, हा आराखडा शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. तसेच नैसर्गिक प्रवाह दर्शविणारा स्वतंत्र डीएमपी आराखडा यापूर्वीच मंजूर होऊन महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला आहे. आदीला नदीसाठी जलसंपदा विभागामार्फत रेड लाईन व ब्लू लाईन मार्किंग करण्यात येणार असून, अधिकृत रेखांकन प्राप्त झाल्यानंतर बांधकाम परवानगी प्रक्रियेत अभिप्राय देणे संबंधित अभियंत्यांना बंधनकारक राहणार आहे. शहरातील इतर नाल्यांच्या बाबतीत गाव नकाशे, डीपी व डीएमपी यांच्या आधारे नाल्यांच्या बाह्य हद्दी निश्चित करून त्यानुसार मार्किंग केली जाणार आहे. डीएमपी मध्ये दर्शविलेल्या नाल्यांच्या स्थिती, मोजमाप व डिझाईनमध्ये बदल करता येणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

| |
|---|
| दि. २ फेब्रुवारी २०२६ पासून नियमांची अंमलबजावणी |
| ब्लू लाईन, रेड लाईन व डीएमपी शिवाय ले-आऊट व बांधकाम परवानगी नाही |
| नाल्यांच्या डिझाईन, रुंदी व प्रवाहात बदलास सक्त मनाई |
| जबाबदारी मिळकतदार व लायसन्सधारक अभियंता / वास्तुविशारदांवर |
| कुचराई किंवा हलगर्जीपणास शिस्तभंगाची कारवाई |
| नगररचना विभागातील उपअभियंता व कनिष्ठ अभियंता यांना काटेकोर निर्देश |



## शिवीगाळीच्या कारणावरुन मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

राहत्या घराजवळ शिवीगाळीच्या कारणावरून एकास चौघांनी मिळून विटाणे म ारहाण केल्याने त्याच्या डोक्यात गंभीर जखम झाली रात्री उशिरा त्याला सिविल हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले.

शुभम सुनील फाळके वय १८ राहणार योगायोग नगर, शेळगी सोलापूर हा दि. २ फेब्रुवारी रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास राहत्या घराजवळ शिवीगाळीमुळे तम्मा सुतार, गोपी सुतार व इतर २ जणांनी मिळून विटाणे मारहाण केल्याने त्यास डोक्यात जखम झाल्याने उपचारासाठी शासकीय रुग्णालयात मित्र नागेश नागणसूरे याने दाखल केले. याची नोंद सिविल पोलीस चौकीत झाली आहे.

# टीईटीमुळे २४०० शिक्षकांना निवडणूक सेवेतून सूट

- हॉल तिकीट तपासूनच कार्यमुक्ती
- राखीव कर्मचारी व बीएलओंवर निवडणुकीची जबाबदारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ फेब्रुवारी-**

टीईटी अर्थात शिक्षक पात्रता परीक्षा आणि जिल्हा परिषद निवडणूक एकाच दिवशी येत असल्याने निर्माण झालेली अडचण दूर करण्यात आली. टीईटी परीक्षेला बसलेल्या २४०० शिक्षकांना निवडणूक कामातून मुक्त करण्यात आले आहे. संबंधित शिक्षकांना टीईटी परीक्षेचे हॉल तिकीट प्राप्त झाल्याची खात्री करूनच त्यांना निवडणूक सेवेतून सूट देण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषद निवडणूक प्रमुख संतोष देशमुख यांनी दिली.



दि.७ फेब्रुवारी रोजी टीईटी परीक्षा तसेच जिल्हा परिषदेसाठी मतदान होणार असल्याने निवडणूक कामावर नियुक्त असलेल्या आणि टीईटी परीक्षेला बसलेल्या शिक्षकांसमोर मोठी अडचण निर्माण झाली होती. त्याविषयी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचा आढावा घेण्यात आला. सुरुवातीला सुमारे ४५०० शिक्षक टीईटी परीक्षेला बसणार असल्याची माहिती समोर आली होती. मात्र, सखोल पडताळणी केल्यानंतर हॉल तिकीट प्राप्त झालेल्या शिक्षकांची संख्या २४०० इतकी असल्याचे स्पष्ट झाले. या २४०० शिक्षकांच्या जागी राखीव ठेवण्यात आलेले कर्मचारी, खासगी व विनाअनुदानित शाळांमधील शिक्षक, बीएलओ (बूथ लेव्हल ऑफिसर) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नव्याने नियुक्त कर्मचाऱ्यांना मंगळवारी प्रशिक्षण देण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. ज्या कर्मचाऱ्यांना निवडणूक कामासाठी नियुक्ती आदेश देण्यात आले होते, त्यामध्ये टीईटी परीक्षार्थी शिक्षकांचा समावेश असल्याचे निदर्शनास आल्यानंतर त्यांना तत्काळ कार्यमुक्त करण्यात आले.

**आवश्यक वेळ मिळणार**

या निर्णयामुळे टीईटी परीक्षा देणाऱ्या शिक्षकांना परीक्षा देण्यासाठी आवश्यक वेळ मिळणार असून, त्यांच्या शैक्षणिक भवितव्यावरील अनिश्चितता दूर झाली आहे. निवडणूक व्यवस्थेवरही कोणताही विपरित परिणाम होणार नाही, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

## रिक्षा चालकाने कट मारल्याने महिला जखमी

**सोलापूर :** दुचाकीवरून डबलसीट जात असताना अज्ञात रिक्षा चालकाने कट मारल्याने मुकामार व जखम झाल्याने महिलेला सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले. महादेवी बनसोडे वय ६० राहणार मुळेगाव, सोलापूर या ३ फेब्रुवारी रोजी सकाळी सातच्या सुमारास दुचाकीने मागे बसून डबल शीट मुळेगाव ते मार्केट यार्ड दिशेने जात असताना मोतीवाला हॉल समोर, आज्ञात रिक्षाने कट मारल्याने त्या पडल्या. कमरेला मुकामार, गुडघ्या जखम झाल्याने उपचारासाठी मुलगी अर्चना गायकवाड यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले.

# बुलेट ट्रेनमुळे सोलापूरच्या आयटी पार्कला नवी दिशा

## धार्मिक पर्यटनालाही मोठी चालना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ फेब्रुवारी-**

हाय स्पीड अर्थात बुलेट ट्रेन प्रकल्पामुळे सोलापूर शहराच्या विकासाला वेग मिळणार आहे. प्रस्तावित आयटी पार्कसाठी हा प्रकल्प गेमचेंजर ठरणार आहे. सोलापूरमधील आयटी पार्कचे भूमिपूजन लवकरच होणार आहे. बुलेट ट्रेनमुळे पुणे, मुंबई आणि हैदराबादसारख्या देशातील प्रमुख आयटी हबशी सोलापूरची थेट व जलद जोडणी होणार आहे. त्यामुळे आयटी कंपन्या, स्टार्टअप्स, बँकिंग बॅक-ऑफिसेस, डेटा सेंटर्स आणि विविध टेक्नॉलॉजी सेवा क्षेत्रातील गुंतवणूकदार सोलापूरकडे आकर्षित होण्याची शक्यता वाढली आहे.

कमी खर्चात उपलब्ध जमीन, मोठ्या प्रमाणावर उपलब्ध मनुष्यबळ आणि वेगवान कनेक्टिव्हिटी ही त्रिसूत्री सोलापूरला नवीन आयटी डेस्टिनेशन म्हणून पुढे आणू शकते. आयटी पार्क आणि हायस्पीड बुलेट ट्रेन हे दोन्ही प्रकल्प जवळपास एकाच कालावधीत पूर्ण होण्याची शक्यता असल्याने, स्थानिक तरुणांसाठी मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होईल. यामुळे शहरातून होणारे स्थलांतर थांबण्यास मदत होऊन सोलापूरच्या स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी मिळणार आहे. दरम्यान, बुलेट ट्रेनमुळे सोलापूर आणि परिसरातील धार्मिक पर्यटनालाही नवी ऊर्जा मिळणार आहे. सोलापूरचे श्री सिद्धरामेश्वर मंदिर, अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ मंदिर, तुळजापूरची श्री तुळजाभवानी देवी आणि पंढरपूरचे विठोबा मंदिर या प्रमुख तीर्थक्षेत्रांपर्यंत भाविकांना अल्प वेळेत पोहोचता येणार आहे. पुणे, मुंबई आणि हैदराबादसारख्या महानगरांतील भाविकांना वीकएंडमध्ये दर्शन घेणे शक्य होणार आहे.

**औद्योगिक, आर्थिक, सांस्कृतिक विकास**

हॉटेल व्यवसाय, वाहतूक सेवा, स्थानिक व्यापारी आणि सेवा क्षेत्राला याचा थेट फायदा होणार आहे. सोलापूर जिल्हा धार्मिक पर्यटनाच्या केंद्रस्थानी येण्यास मोठी मदत होणार आहे. एकूणच, बुलेट ट्रेन प्रकल्पामुळे सोलापूरचा औद्योगिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विकास नव्या उंचीवर जाण्याची चिन्हे दिसत आहेत.

**बुलेट ट्रेनचे दीर्घकालीन परिणाम**

- ✔ वेगवान आणि सुरक्षित प्रवास
- ✔ उद्योग व पर्यटनाचा समतोल विकास
- ✔ जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेला बळकटी
- ✔ सोलापूरचा राज्यातील विकास केंद्र म्हणून उदय


**आयटी पार्कमुळे होणारे फायदे**

- ✔ हजारो तरुणांसाठी स्थानिक रोजगार
- ✔ आयटी, स्टार्टअप आणि सेवा क्षेत्रातील गुंतवणूक
- ✔ शहराच्या पायाभूत सुविधांचा विकास
- ✔ घरबांधणी आणि रिअल इस्टेटला चालना

**धार्मिक पर्यटन होणार सुलभ**

- ✔ प्रमुख तीर्थक्षेत्रांना वाढती भाविक संख्या
- ✔ हॉटेल, लॉज आणि भोजनालय व्यवसायात वाढ
- ✔ स्थानिक व्यापाऱ्यांना आर्थिक लाभ
- ✔ सोलापूर जिल्ह्याची पर्यटन नकाशावर ठळक ओळख





सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १३४६

**भजन घाली भोगावरी ।अकर्तव्य मनीं धरीं ।।**
**धिग त्याचें साधुपण । विटाळूनि वर्ते मन ।।**

माणसाचे मोठेपण हे त्याच्या राहणीमानावर किंवा बाह्य दिखाव्यावर अवलंबून नसून ते त्याच्या वर्तनावर अवलंबून असते. हे सत्य असले तरीही लोक वर्तनाकडे न पाहता व्यक्तीच्या राहणीमानाकडे किंवा त्याच्या बाह्य दिखाव्याकडे पहात असतात. नेमका लोकांच्या अशा दृष्टीचा गैरफायदा समाजातील कांही लोक घेतात. आपला बाह्य पेहराव किंवा आपले बाह्य वर्तन बदलून समाजाची फसवणूक करतात. विशेष म्हणजे समाज अशा स्वार्थी बहिरुपींना बळीही पडतो.



अंतर्गत वर्तन कर्तव्यशून्य ठेवून बहिर्गत वर्तन दर्शविणारे हे लोक लोकांना फसवून स्वार्थ साधून घेतात. सहजरित्या समाजाची फसवणूक करता येणारे क्षेत्र म्हणून ढोंगी लोक अध्यात्मिक क्षेत्राची निवड करतात. साधु-संतांचा पेहराव धारण करुन तुटक-फुटक चार संतोक्त्या सांगून स्वत:कडे साधुत्व मिळवितात. अशा लोकांचा प्रचार करणारे किंवा यांचा मोठेपणा गाणारेही कांही कमी नसतात. बाह्य पेहराव त्यांच्या मनालाही स्पर्श करीत नाही. मात्र यांचा हा पेहराव लोकांना भुलविण्यात आणि लोकांच्या मनात स्थान मिळविण्यात यशस्वी होतो. अशा ढोंगी लोकांचे मन भजन, पुजनात नसते. यांचे भजन-पुजन हे फक्त भोगासाठी असते. यांच्या मनात कर्तव्याचा सुगंध अजिबात दरवळत नाही. अशा लोकांबद्दल बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, भजन घाली भोगावरी । अकर्तव्य मनीं धरीं ।। धिग त्याचें साधुपण । विटाळूनि वर्ते मन ।।

स्वत:चा परिचय करुन घेण्याऐवजी लोकांची फसवणूक करण्याच्या हेतूने जोपासले जाणारी साधुत्वाची ढोंगी वृत्ती कोणासाठीही फायदेशीर नसते. पेहराव आणि बाह्यवर्तनावरुन साधुपण दाखविणाऱ्या आणि कर्तव्यशून्य असणाऱ्या फसव्या साधुचे साधुपण धिक्कारण्याजोगे असते. अशा ढोंगी लोकांचा सहवासही नुकसानकारक असतो. आपल्या वर्तनामुळे आपणाला आणि इतरांना समाधान मिळावे हा साधुत्वाचा आधारस्तंभ असतो. पण ढोंगी साध या आधारस्तंभाला पोखरुन टाकणारे वर्तन करतात. अशा लोकांमुळे चांगले संत, महात्म्ये लोकांच्या शंका, कूशंकाचे साधन बनतात. उघड-उघड वाईट किंवा चुकीच्या पध्दतीने वागणाऱ्यांपेक्षा असे ढोंग करुन वागणारे लोक समाजासाठी जास्त घातक असतात. उघडपणे वागणाऱ्यांर वेळीच अंकुश घालता येतो. पण अशा ढोंगी लोकांवर सहजासहजी अंकुश घालता येत नाही. कारण यांची खेळी ही छुपी व भावनात्मक असते. लोकांची अंधश्रध्दा अशा ढोंगी लोकांच्या वर्तनाला पुष्ट देते. समाज सुधारण्याऐवजी समाजाला जास्तीत जास्त अंधश्रध्देत कसे ठेवता येईल व त्यांची फसवणूक करुन स्वार्थ कसा साधता येईल, असा विचार हे लोक करतात. यांना ईश्वर आहे का? आहे तर तो कोठे आहे? कर्तव्य म्हणजे नेमके काय? आपण कोण आहोत? आदींपैकी कोणत्याही प्रश्नाचे उत्तर माहिती नसते. अशा अज्ञानी लोकांना लोक आत्मज्ञानी समजून मान-सन्मान, देतात यांचे आश्चर्य वाटते. ज्यांना ज्ञानोबाराय, तुकोबाराय समजले ते लोक अशा ढोंगींना अजिबात स्थान देत नाहीत. म्हणून हे ढोंगी लोक लोकांना ख-या अर्थाने ज्ञानोबा, तुकोबाच कळू देत नाहीत. खरे म्हणजे यांनीही संत ज्ञानोबा-तुकोबा समजलेले नसतात, म्हणूनच हे लोक स्वार्थापोटी कांहीही करीत असतात, असो, आपले बाह्य व अंतर्गत वर्तन समान राहिल याकडे आपण लक्ष द्यावे. चूक भूल क्षमस्व. जय जय राम कृष्ण हरी.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : बुधवार,**
**दि. ४ फेब्रुवारी २०२६**
**विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - माघ तृतीया**
**ऋतु - हेमंत ।**
**नक्षत्र- पू. फाल्गुनि (२२.१२)**
**योग - अतिगंड (२५.०३)**
**करण - वणिज (१२.१९)**
**राहू काल :**
**बुधवार : दु. १२ ते १.३०**

**दिनविशेष : जागतिक कर्करोग दिन:** कर्करोगाविषयी जागरूकता, प्रतिबंध आणि उपचारांबद्दल माहिती देण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो.
**तानाजी मालुसरे बलिदान दिन (१६७०):** तानाजी मालुसरे यांनी सिंहगडावर विजय मिळवताना सर्वोच्च बलिदान दिले. **(२००४):** मार्क झुकरबर्गने सोशल नेटवर्किंग साइट 'फेसबुक' सुरू केली.




## अहिल्याबाई कनिष्ठ महाविद्यालयात बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात

### ओंकार धनके व वैष्णवी बिराजदार आदर्श विद्यार्थी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

येथील विद्यालयात इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांचा सदिच्छा (निरोप) समारंभ अत्यंत उत्साही व भावनिक वातावरणात पार पडला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रवासाला शुभेच्छा देण्यासाठी आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांसह शिक्षक उपस्थित होते.

या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे संस्थापक सचिव हाजी बंदेनवाज शेख तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य इस्माईल शेख उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. या प्रसंगी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठी आदर्श विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. यामध्ये धनके ओंकार व वैष्णवी बिराजदार यांची आदर्श विद्यार्थी म्हणून निवड करण्यात आली. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दोन्ही विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांच्या शैक्षणिक कामगिरीबद्दल त्यांचे कौतुक करण्यात आले व प्रेरणादायी थाप देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.शितल राठोड यांनी केले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा.महेंद्र ढवाण यांनी केले, व कार्यक्रमाची सांगता झाली. सदिच्छा समारंभ विद्यार्थ्यांच्या आठवणीत कायम राहील, असा हा कार्यक्रम ठरला.





# वीरतपस्वी आनंदमेळा म्हणजे संस्कृतीचा उत्सव

## काशी जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी -**

वीरतपस्वी आनंदमेळा म्हणजे आनंद, संस्कार आणि संस्कृतीचा उत्सव असल्याचे प्रतिपादन काशी जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांनी केले.

श्री वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजींच्या ७० व्या पुण्यतिथी निमित्त वीरतपस्वी शिक्षण संकुल एम आयडीसीच्या प्रांगणात आयोजित केलेल्या आनंदमेळाच्या उद्घाटनप्रसंगी आशीर्वाचन करताना ते बोलत होते यावेळी जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ, डाइटचे प्राचार्य नदाफ सर, शिक्षण विस्तार अधिकारी बापूराव जमादार, शेळगीचे केंद्रप्रमुख चंद्रकांत वाघमारे, संस्थेचे सचिव शांतया स्वामी, संचालक शशिकांत रामपुरे, डॉ. राजीव मठ आदींची प्रमुख उपस्थिती होती.

प्रथमतः मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. यावेळी बोलताना भुजबळ म्हणाले, वीरतपस्वी शाळा म्हणजे केवळ अभ्यासाचे ठिकाण नसून आयुष्य घडवणारी, मूल्य व संस्कार रुजवणारी शाळा असल्याचे सांगून आनंदमेळा या उपक्रमाचे प्रशंसा केली.त्यानंतर रंगीबेरंगी प्रकाशझोतात, टाळ्यांच्या कडकडाटात आणि हाश्यांच्या गजरात हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या विविध कला गुणदर्शनाच्या सांस्कृतिक कार्यक्रमास सुरुवात झाली. श्री गुरु महिमा, श्री गणेश वंदन, विविध सामाजिक व ऐतिहासिक विषयावर आधारित विनोदी, व्यसनमुक्ती नाटक, आधुनिक गीतावर आधारित सदाबहार नृत्य व देशभक्तीपर गीतावर आधारित समूह नृत्य सादर करून विद्यार्थ्यांनी अतिथी गणांचे व पालकांचे मन जिंकले. सांस्कृतिक कार्यक्रमात जवळजवळ ६०० विद्यार्थी सहभागी झाले होते आनंद मेळाव्यात विविध खाद्यपदार्थांचे ९० स्टॉल्स उभारलेले होते. विद्यार्थ्यांनी स्टॉलमधून चवदार पदार्थांची विक्री करण्याबरोबरच संघभावना, जबाबदारी आणि उद्योजकतेचे धडे घेतले. या मेळाव्यात ८ ते १० लाख रुपयांची उलाढाल झाली. या आनंद मेळ्यास उपमुख्याध्यापक धनंजय नकाते. पर्यवेक्षक संतोषकुमार तारके, केदार पटणे,संस्थेच्या विविध शाखांचे मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक व हजारो पालक उपस्थित होते.

## शिवजयंतीनिमित्त रंगभरण स्पर्धेसाठी ५ फेब्रुवारीपर्यंत नोंदणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**



छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधुन डॉ.पंजाबराव देशमुख राष्ट्रीय शिक्षक परिषदेच्या वतीने जिल्हास्तरीय रंगभरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याची माहीती संघटनेचे जिल्हाध्यक्ष विनोद आगलावे व शहराध्यक्ष अनिल गायकवाड यांनी दिली.

ही स्पर्धा चार गटात पार पडणार आहे.गट पहिला इयत्ता पहिली व दुसरी,गट दुसरा इयत्ता तिसरी व चौथी,गट तिसरा इयत्ता पाचवी व सहावी,गट चौथा इयत्ता सातवी व आठवी.स्पर्धा शाळा स्तरावर पार पडणार आहे. जागतिक दर्जाचे चित्रकार नितीन खिलारे हे स्पर्धेचे परीक्षक म्हणुन काम पाहणार आहेत.प्रत्येक गटातुन प्रथम,द्वितीय,तृतीय व दोन उत्तेजनार्थ विद्यार्थ्यांना गौरविण्यात येणार आहे.स्पर्धेत सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. स्पर्धेची नाव नोंदणी साने गुरुजी शिक्षक सहकारी पतसंस्थेत ५ फ्रेब्रुवारी पर्यंत करावी. या स्पर्धेत जास्तीत जास्त शाळांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले आहे.

## सिद्धेश्वर महाराजांचे पुराण चोरी, घरफोडी केलेल्या एका आरोपीची निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर महाराज यांची चरित्रपर लिहलेले पुराण चोरी करून घरफोडी केलेल्या गुन्ह्यांमधून एका आरोपीची निर्दोष मुक्तता झाली आहे.

एफआयआर मधील हकीकत अशी की, श्री सिध्देश्वर महाराजांचे परंपरेनुसार पुजास्थान वाड्धामध्ये आहे. सदर ग्रंथामध्ये इसविसन ११४० मध्ये कवी राघवान यांनी श्री सिध्देश्वर महाराजांचे चरित्रपर लिहिलेले हस्तलिखीत पुराण जतन करून ठेवण्यात आलेले होते. सदरचे ताम्रपटावर लिहीलेले अंदाजे पाठपोट ५० पेजेस होते. सदर पुराणाची त्याकाळामध्ये हत्तीवरून मिरवणुक काढण्यात आलेले होती. सदरचे पुराण हे फिर्यादी व सोलापूर वासीयांचे श्रध्दा व पुजा स्थान होते. सदरचे पुराण हे फिर्यादी यांच्या वाड्यामधील तळमजल्यावर आसलेल्या पुजेच्या ठिकाणी लाकडी पेठीमध्ये ठेवण्यात आलेले होते. ज्या-ज्या वेळी सदर पुराणावर संशोधन अथवा पुरात्व विभागाचे अधिकारी आले नंतर त्यांना दाखवून परत त्याच ठिकाणी पेठीमध्ये ठेवण्यात आले होते. सदर ठिकाणची नित्यनियमाप्रमाणे फिर्यादी दररोज पाहटे ५.०० वाजता पुजा करीत होते.

घटनेच्या पाहटे ५.०० वा.चे सुमारास फिर्यादी नेहमीप्रमाणे पुजा करण्यासाठी गेले असता तेथे अंमपुराण ठेवलेली लाकडी पेठी व पुजेचे साहित्य दिसून आले नाही. त्यावेळी फिर्यादी पुजेच्या ठिकाणी व तळमजल्यावरील घराची पाहणी केली असता फिर्यादी यांना पुजेचे साहित्य व लाकडी पेठी दिसून आली नाही म्हणून फौजदार चावडी पोलीस स्टेशन आयपीसी ३८०, ४११, ३४ कलम प्रमाणे मध्ये वस्तू चोरी करून घरफोडी केल्याची तक्रार दिली होती.

सदर केस मध्ये आरोपी यांच्या कडून ॲड अखिल. आर. शाक्य वकीलपत्र दाखल करून आरोपीची जामीनावर मुक्तता केलेली होती. सदर केसमध्ये फिर्यादीकडून एकूण ६ साक्षीदार तपासले होते. यामध्ये आरोपीचे ॲड यांनी मे कोर्टासमोर सदर गुन्ह्यामध्ये कोणतेही तथ्य नसून, वरील तपासले गेलेले ६ साक्षीदार यांच्यामध्ये विसंगती दिसून येते आहे, आरोपी ने कोणताही गुन्हा केलेला नाही. असा युक्तिवाद केलेला होता. सदरचा युक्तिवाद ग्राह्य धरून प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी बिराजदार यांनी ॲडव्होकेट अखिल शाक्य यांचा युक्तिवाद ग्राह्य धरून सदर केसमधील आरोपीची निर्दोष मुक्तता करण्याचा आदेश केला.

आरोपीचे कायदेशीर कामकाज ॲड अखिल शाक्य, ॲड अजिंक्य शाक्य, ॲड दर्शना दीक्षा चक्रवर्ती, ॲड अश्विनी कांबळे यांनी काम पाहिले.

## सोलापूरच्या शब्दगंध आणि आराधना संघांची अंतिम फेरीसाठी निवड

### जागतिक मराठी साहित्य अभिवाचन स्पर्धा

**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**



खुली जागतिक मराठी साहित्य अभिवाचन स्पर्धेसाठी येथील शब्दगंध आणि आराधना संघांची चाळीसगाव येथे होणाऱ्या अंतिम फेरीसाठी निवड झाली.

रंगगंध कलासक्त न्यास, चाळीसगाव व भास्करानंदी चित्र सोलापूर आयोजित खुली जागतिक मराठी साहित्य अभिवाचन स्पर्धा लिटिल वंडर्स स्कूल विजापूर रोड सोलापूर येथे उत्साहात पार पडली. दहा संघानी आपला उस्फूर्त सहभाग नोंदविला. स्पर्धेचे उद्घाटन ज्येष्ठ रंगकर्मी राजेश जाधव यांच्या हस्ते झाले तर कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी भास्करानंदी चित्र संस्थेचे अध्यक्ष भास्कर जाधव हे होते. सुरुवातीला दीप प्रज्वलन आणि कै. आनंदी जाधव यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून स्पर्धेला सुरुवात झाली.

प्रतीथयश लेखकांच्या कवितावर आधारित कथा निबंध व ललित लेख नाट्यमयरित्या सादर करून सर्वच संघांनी उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली. सर्वच संघांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. याप्रसंगी वनिता म्हैसकर, सुहास मार्डीकर, अमोल राजमाने, संदीप उडाणशिव, शिरीष देखणे, विजय साळुंखे उपस्थित होते.

पारितोषिक वितरण लिटल वंडर संस्थेच्या अध्यक्ष संगीता माने, भास्करानंदी चित्र संस्थेचे भास्कर जाधव तसेच स्पर्धेचे परीक्षक जयप्रकाश कुलकर्णी, प्रा. गणेश शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि संस्थेचे सचिव संदीप जाधव यांनी आभार मानले.

**स्पर्धेचा अंतिम निकाल याप्रमाणे-**

सांघिक : शब्दगंध सोलापूर (प्रथम), आराधना विश्वस्त मंडळ (द्वितीय).

वैयक्तिक वाचिक अभिनय- सुशांत निकंबे (विशेष उल्लेखनीय), तेजश्री कुमठेकर, अनुश्री जुजगार, सुमित्रा देशमुख, विजय दहिवाळ (अभिनय).

# महाराष्ट्रात रेल्वेसाठी २३ हजार ९२६ कोटींची विक्रमी अर्थसंकल्पीय तरतूद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी -**



अश्विनी वैष्णव, रेल्वे मंत्री यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे महाराष्ट्रासाठीच्या रेल्वे बाबतीतील अर्थसंकल्पीय तरतुदींविषयी माध्यमांना संबोधित करताना सांगितले की, अर्थसंकल्प २०२६-२७ मध्ये महाराष्ट्रासाठी २३,९२६ कोटींची विक्रमी तरतूद रेल्वे करीता करण्यात आली आहे. २००९-१४ या कालावधीत महाराष्ट्रातील रेल्वेकरीता दरवर्षी दिल्या जाणाऱ्या सरासरी १,१७१ कोटींच्या तरतुदीच्या तुलनेत ही तरतूद जवळपास २० पट अधिक आहे.

अर्थसंकल्पात एकूण ७ उच्चगती रेल्वे प्रकल्पांची घोषणा करण्यात आली असून, त्यापैकी २ नवीन बुलेट ट्रेन कॉरिडॉर महाराष्ट्रातील आहेत. मुंबईपुणे : ४८ मिनिटे, पुणेहैदराबाद : १ तास ५५ मिनिटे म्हणजेच २ तासांच्या आत पोहचेल. पायाभूत सुविधांमध्ये आमूलाग्र परिवर्तन: एकूण रु १,७०,०५८ कोटींची कामे प्रगतीपथावर आहेत. या भव्य गुंतवणुकीत संपूर्ण महाराष्ट्रभर नवीन रेल्वे मार्गांची उभारणी, स्थानकांचे पुनर्विकास तसेच संरक्षासाठीच्या सुधारणा यांचा समावेश आहे.

अमृत स्टेशन योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील १३२ स्थानकांची संपूर्ण नवनिर्माणासाठी निवड करण्यात आली आहे. स्थानकांच्या आधुनिकीकरणासाठी एकूण गुंतवणूक रु ५,६७५ कोटीची करण्यात आली. राज्यात प्रीमियम रेल्वे सेवांच्या परिचालनामुळे प्रवास कार्यक्षमतेला नवे उंची प्राप्त झाली आहे. वंदे भारत एक्सप्रेस १२ जोड्या, अमृत भारत एक्सप्रेस ५ जोड्या आहेत. २०१४ पासून सुमारे २,४००किमी रेल्वेमार्गांचे बांधकाम करण्यात आले आहे. हे मलेशियाच्या संपूर्ण रेल्वे जाळ्यापेक्षा अधिक आहे. राज्यात १००% विद्युतीकरण पूर्ण झाले असून, २०१४ पासून ३,७४४ किमी रेल्वेमार्गांचे विद्युतीकरण करण्यात आले आहे. रस्ता सुरक्षितता सुधारण्यासाठी १,२२८ रेल्वे उड्डाणपूल व रेल्वे अंडरपास मार्गांचे बांधकाम करण्यात आले आहे. कवच प्रणालीस ४,९७१ रूट किमी वर मंजुरी देण्यात आली असून, त्यापैकी ५७६ रूट किमी वर कार्यान्वयन झाले आहे आणि ३,६१७ रूट किमी वरील कामे/निविदा प्रक्रिया सध्या प्रगतीपथावर आहेत.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे प्रतीक गोस्वामी, महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे अवनीश कुमार पांडे, मुख्य प्रशासकीय अधिकारी रजनीश माथूर, प्रधान मुख्य अभियंता; अरविंद मालखेडे, प्रधान मुख्य वाणिज्य व्यवस्थापक, मध्य रेल्वे तसेच हिरेश मीना, विभागीय रेल्वे व्यवस्थापक, मुंबई विभाग, सोलापूर डीआरएम मिश्रा, जयदीप प्रदक्षिणा, योगेश पाटील, विक्रम सिंग आदी उपस्थित होते.



## संत रविदासांचे विचार आजही प्रेरणादायी : शाहीर रमेश खाडे

**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी -**

श्री संत गुरु रोहिदास महाराजांची जयंती सर विश्वेश्वरय्या को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटीच्या सभागृहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात त्रिसरण,पंचशील घेऊन करण्यात आली. याप्रसंगी शाहीर रमेश खाडे यांनी श्री संत रोहिदास महाराज यांच्या कार्यकर्तृत्वाचा आलेख मांडून, ऐतिहासिक घटनाक्रम सांगितला. संस्थेचे सचिव मोहन कांबळे, प्रा. डॉ. सुहास उघडे यांनी आपले विचार मांडले. याप्रसंगी संस्थेचे खजिनदार अभिमन्यू कसबे, किसन कांबळे, क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती.



## मोफत इलेक्ट्रॉनिक्स कृत्रिम हात बसण्याच्या शिबिराचा १०० नागरिकांनी घेतला लाभ

**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

जैन सोशल ग्रुप फेडरेशन महाराष्ट्र रिजन आणि इनाली फाउंडेशन आयोजित मोफत इलेक्ट्रॉनिक कृत्रिम हात बसवण्याच्या शिबिराचे काम बघून अजूनही समाजात माणूसकी जिवंत असल्याचे मत अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी व्यक्त केले. सम्राट चौक १३ पंथ भवन येथे संपन्न झालेल्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. मंदिराचे ट्रस्टी कन्नुभाई शाह चेतन सुराणा, परिमल भंडारी, गौतम छाजेड, उमेश कर्णावत, भव्य शहा, पिंकी कवाड आदी उपस्थित होते. मोफत इलेक्ट्रॉनिक्स कृत्रिम हात बसण्याच्या या शिबिरात एकूण शंभर नागरिकांनी लाभ घेतला. कृत्रिम शाळा बसविताना त्यांना त्याचा उपयोग कसा करायचा याचा सामान्य प्रशिक्षण यावेळी देण्यात आला. शहराच्या विविध भागातून आलेले होते. कार्यक्रमाचे प्रस्तावना चेतन सुराणा यांनी केले तर आभार परिमल भंडारी यांनी मानले तर सूत्र संचालन भव्या शाह, पिंकी कवाड यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कैलास कोठारी देवेंद्र बिराजदार सोनिया संकेश्वर सीए अमित जोशी अभिजीत शहा संजय पोरवाल अजय गांधी दिनेश जैन आदींनी प्रयत्न केले.

# ग्रामविकासासाठी भाजपाला साथ द्या : पालकमंत्री

## बार्शीत भाजपाच्या संवाद मेळाव्यास कार्यकर्त्यांची गर्दी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.३ फेब्रुवारी-**

जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत या अंतर्गत येणाऱ्या ग्रामीण भागांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी भाजपच्या उमेदवारांना विजयी करा, असे आवाहन ग्रामविकास मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी बार्शीत केले.

बार्शी तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीच्या प्रचाराच्या संवाद मेळाव्यात मंत्री गोरे बोलत होते. यावेळी माढ्याचे माजी खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर, माजी आमदार राजेंद्र राऊत, नगराध्यक्षा तेजस्विनी कथले, उपनगराध्यक्ष रोहित पाटील, बाजार समितीचे सभापती विजय गरड, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष रणवीर राऊत आणि सर्व जि. प. व पंचायत समितीचे उमेदवार उपस्थित होते.

यावेळी मंत्री गोरे म्हणाले, राजेंद्र राऊत यांनी बार्शी कृषी उत्पन्न बाजार समिती आणि बार्शी नगरपरिषदेवर निर्विवाद वर्चस्व मिळवत सत्ता स्थापन केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे देखील बार्शीवर विशेष लक्ष आहे. निधीसाठी मुख्यमंत्री कधीच नाही म्हणत नाहीत. त्यामुळे बार्शीच्या ग्रामीण भागातील जनतेने देखील या निवडणुकीत भाजपच्या सर्व उमेदवारांना विजयी करुन हॅट्ट्रिक करावी,



असे आवाहन गोरे यांनी यावेळी केले. राऊत यांनीही बार्शीच्या ग्रामीण भागात जामगांव, उपळाई आणि वैराग येथे औदयोगिक वसाहत निर्माण करण्यासाठी भाजपला साथ देण्याचे आवाहन केले. तसेच बाजार समितीच्या माध्यमातून ग्रामीण जनतेसाठी ५० ते १०० खाटाचे रुग्णालय शासनाच्या सहकार्याने करु, असेही आश्वासन राऊत यांनी दिले. कार्यक्रमास तालुक्यातील कार्यकर्ते उपस्थित होते.

## महत्वाचे...



### सांगोल्यात संत रविदास महाराज यांची जयंती साजरी

**सांगोला, दि. ३ फेब्रुवारी-**

श्री संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांची ६४९ वी जयंती सांगोला शहरातील खडतरे गल्ली येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. तसेच सांगोला नगरपरिषद मध्ये संत रविदास महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन नगराध्यक्ष आनंदा माने यांनी केले. यावेळी नगरसेवक माऊली तेली, अरुण पाटील, राजेश खडतरे, दिपक खडतरे, प्रविण खडतरे, सोनू खडतरे, महेश खडतरे, पप्पू खडतरे, शैलेंद्र खडतरे उपस्थित होते.



### ब्रिमा सागरच्या शिबिरात ६८ जणांचे रक्तदान

**श्रीपूर, दि. ३ फेब्रुवारी-**

श्रीपूर (ता. माळशिरस) येथील ब्रिमा सागर डिस्टलरीजच्या वतीने घेण्यात आलेल्या रक्तदान शिबीरात ६८ जणांनी रक्तदान करून सहभाग नोंदविला. कारखान्याचे माजी संचालक यश कोठारी यांच्या स्मृतीदिना निमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. शिबीराचे उद्घाटन विद्यमान संचालक उदय कोठारी, उप जिल्हा रुग्णालय अकलुजचे अधिक्षक बापूसाहेब ओव्हाळ , कारखान्याचे वैद्यकिय अधिकारी डॉ. सुधीर पोफळे, ब्लड बॅन्केचे डॉ. संतोष खडतरे, आंतरराष्ट्रीय खेळाडू जयंत खंडागळे , कंपनीचे व्यवस्थापक दिनकर बेंबळकर, उपव्यवस्थापक चंद्रशेखर भागवत, नरेश पाठक, रसायनतज्ञ संतोष डिंगरे, सुरक्षा अधिकारी भागवत पारसे उपस्थित होते. प्रथम कै. यश कोठारी यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. प्रास्ताविक वैद्यकीय अधिकारी डॉ. सुधीर पोफळे यांनी केले. रक्तदान शिबीरानंतर हॉलीबॉल स्पर्धांचे उद्घाटनही करण्यात आले. या स्पर्धेचा बक्षिस वितरण समारंभ दि.२ फेब्रुवारीला होणार आहे. अभियंते प्रसाद अक्कलकोटकर यांनी सूत्रसंचालन केले.




### कविता कोळगे-सपाटे यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

**बार्शी, दि. ३ फेब्रुवारी-**

तालुक्यातील खांडवी येथील मतिमंद निवासी शाळेतील क्रीडाशिक्षिका तसेच स्पेशल ऑलिंपिक भारतच्या भारतीय महिला थलेटिक्स संघाच्या माजी आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक कविता कोळगे-सपाटे यांना 'बी दि चेंज फाऊंडेशन' तर्फे देण्यात येणारा राज्यस्तरीय 'आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार शिर्डी येथील श्री साई पालखी निवारा येथे दि. १ फेब्रुवारी रोजी आयोजित समारंभात भारतीय सैन्य दलाचे निवृत्त कर्नल सुनील राजदेव यांच्या हस्ते सन्मानपत्र व ट्रॉफी देऊन प्रदान करण्यात आला. मतिमंद व विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या क्रीडा विकासासाठी सातत्याने केलेले उल्लेखनीय कार्य, विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर घडविण्यासाठी दिलेले मोलाचे योगदान तसेच क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन हा सन्मान प्रदान करण्यात आला आहे. याबद्दल त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.




### सांगोल्यात मतदान जनजागृती मोहीम

**सांगोला, दि. ३ फेब्रुवारी-**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी पंचायत समिती, सांगोला अंतर्गत गटविकास अधिकारी उमेशचंद्र कुलकर्णी व स्वीप नोडल अधिकारी अभिजीत मोलाने यांच्या मार्गदर्शनाखाली आयसीडीएस यांच्या मार्फत सांगोला, वाढेगाव, मेडशिंगी व बामणी येथे मतदान जनजागृती मोहीम घेण्यात आली. या मोहिमेत अंगणवाडीतील सेविका सहभागी झाल्या होत्या. लोकजागृतीसाठी त्यांनी रांगोळी, बॅनर, पोस्टरद्वारे मतदानाचे महत्त्व जनतेस पटवून दिले. प्रत्येकाचे मत हे महत्त्वाचे असून निर्भय व मुक्त मतदान करा, लोकशाही बळकट करा अशा घोषणा दिल्या. यासाठी अंगणवाडी पर्यवेक्षिका अशा वाघमारे, राजश्री जंबेनाळ, पल्लवी चंदनशिवे, अर्चना सांगोलकर, माधुरी वाघमारे, सरस्वती जाधव यांनी सहभाग घेतला अशी माहिती मीडिया नोडल अधिकारी मिलिंद सावंत यांनी दिली. तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी नियुक्त केलेले मतदान अधिकारी व कर्मचारी यांचेपैकी सीटीईटी परीक्षा असल्याने आतापर्यंत एकूण २७६ लोकांचे आदेश विनंती अर्जावरून रद्द करण्यात आले असल्याची माहिती सहा.निवडणूक निर्णय अधिकारी बाळूताई भागवत यांनी दिली. ४०० नवीन फक्त महिला कर्मचारी यांना आदेश देण्यात आले आहेत अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी बी.आर.माळी यांनी दिली.




## सिद्धेश्वर वुमेन्स पॉलिटेक्निकमध्ये 'परदेशातील करिअर संधी' विषयावर संवाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३ फेब्रुवारी-**

श्री सिद्धेश्वर वुमेन्स पॉलिटेक्निक, सोलापूरच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाने विद्यार्थ्यांसाठी 'परदेशातील करिअर संधी' या विषयावर तज्ञांशी संवाद सत्राचे आयोजन करण्यात आले.

या सत्रासाठी कॅलिफोर्निया येथील नामांकित तज्ज्ञ श्री. निखिल गजानन धरणे तसेच शुभांगी निखिल धरणे, डेटा इंजिनिअर, कॅलिफोर्निया यांनी मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम संवादात्मक मुलाखतीच्या स्वरूपात आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी या संवादात सक्रियपणे भाग घेतला आणि करिअर नियोजन, कौशल्य विकास आणि जागतिक नोकरीच्या संधींबद्दल मौल्यवान मार्गदर्शन मिळवले. हे सत्र माहितीपूर्ण आणि प्रेरणादायी ठरले, ज्यामुळे विद्यार्थ्यांना परदेशात काम करण्याच्या वास्तविक आव्हाने आणि संधी समजण्यास मदत झाली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य गजानन धरणे यांनी पाहुण्यांचे स्वागत व सत्कार केले. तसेच आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थिनींसाठी जागतिक संधींची ओळख महत्त्वाची असून अशा तज्ज्ञ संवाद सत्रांमुळे त्यांना योग्य दिशा मिळते असे मत व्यक्त केले. कार्यशाळा पार पाडण्यासाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. प्रमोद मेणसे, प्रा. प्रियांका चन्ना, प्रा. गायत्री लंगोटे, प्रा. सायली तळेकर, प्रा. श्रुतिका तळेकर, कृष्णाली डोरले, विशाल दुधगी, कोळी डी. व्ही. व किरण गलगली यांचे सहकार्य लाभले.

## श्री वटवृक्ष स्वामी महाराज गुरुप्रतिपदा उत्सव साजरा

### महेश इंगळे, अमोलराजे भोसले यांच्या हस्ते पालखी मिरवणुकीचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.३ फेब्रुवारी-**

येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात गुरुप्रतिपदा उत्सव साजरा करण्यात आला. श्रींच्या सजविलेल्या पालखी सोहळ्याची सुरुवात पुरोहित मंदार महाराज, व्यंकटेश पुजारी, मोहित महाराज यांचे हस्ते आरती करून व देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे व श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांचे हस्ते पालखी पूजन करून करण्यात आली.



पहाटे ५ वाजता मंदीर समितीचे चेअरमन महेश इंगळे, प्रथमेश इंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पुरोहित मोहनराव पुजारी व मंदार महाराज पुजारी यांच्या हस्ते श्रींची काकड आरती संपन्न झाली. सकाळी ८:३० वाजता प्रथमेश इंगळे यांच्या हस्ते देवस्थानचे लघुरुद्र संपन्न झाले. सकाळी ११:३० वाजता श्रींना महानैवेद्य अर्पण करून भक्त निवास येथे स्वामी भक्तांना भोजन महाप्रसाद देण्यात आला. याचा लाभ हजारो स्वामी भक्तांनी घेतला. दुपारी १ ते ३ या वेळेत दिवसभर हजारो भाविकांनी श्रींचे दर्शन घेतले. पालखी मिरवणुक फत्तेसिंह चौक, मेन रोड, कारंजा चौक, समाधि मठ, परतीचा मार्ग कारंजा चौक, मौलाली गल्ली, सुभाष गल्ली, मधला मारुती, भारत गल्ली, देशमुख गल्ली, मार्गे वटवृक्ष मंदिरात रात्री साडे नऊ वाजता पालखी मंदिरात आल्यानंतर गुरु भजन होवून उपस्थित सर्व भाविकांना मंदिर समितीच्या वतीने शिरा प्रसाद वाटप करून या गुरूप्रतिपदा उत्सव कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी मंदार महाराज पुजारी, महेश इंगळे, अमोलराजे भोसले, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, उज्वला सरदेशमुख, संपतराव शिंदे, चंदकांत गवंडी, प्रा.शिवशरण अचलेर, प्रसाद पाटील, डॉ. हिरण्णा पाटील, अंकूश केत, बाळासाहेब एकबोटे, शशिकांत लिंबीतोटे, प्रदिप हिंडोळे, दिपक जरिपटके, अमर पाटील, प्रसन्न हत्ते, रामचंद्र समाणे, सागर गोंडाळ, गिरीश पवार, प्रविण घाटगे, प्रसाद सोनार, महेश काटकर, संजय पवार, बाळासाहेब घाटगे, स्वामीनाथ लोणारी, श्रीशैल गवंडी, ऋषिकेश लोणारी, अविनाश क्षीरसागर, संतोष जमगे, लखन सुरवसे, संजय बडवे, निखील पाटील, आदीत्य गवंडी, दादा सावंत, नागनाथ जेऊरे, तुषार मोरे, स्वप्निल गायकवाड, युवराज सोनटक्के, दर्शन घाटगे उपस्थित होते.



## आंतरराष्ट्रीय अबॅकस परीक्षेसाठी इरा स्कूलच्या विद्यार्थ्यांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.३ फेब्रुवारी-**

इरा पब्लिक स्कूल जेऊर मधील पाच विद्यार्थ्यांची श्रीलंका येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय अबॅकस स्पर्धा परीक्षेसाठी निवड झालेली आहे. यामध्ये वीरप्रताप सूर्यकांत चौधरी, वेदांत विशाल रोडे, सानवी मनोज गणगे, राजवीर प्रमोद पोळ, नेत्राली गणेश शिरसकर या पाच विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे. त्याबद्दल त्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या मुथा व वानरसे यांचे इरा पब्लिक स्कूलचे सचिव सुनिल अवसरे, मुख्याध्यापिका अवसरे यांनी अभिनंदन केले.

## विशाल रेपाळ यांच्या 'माझी गणित शाळा' या साहित्यास राज्यात चतुर्थ क्रमांक

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. ३ फेब्रुवारी-**

नागपूर येथे ५३ व्या राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. प्रदर्शनात विशाल विष्णुदास रेपाळ उपशिक्षक जि.प.प्रा. शाळा अलंकापुरी करकंब यांनी शैक्षणिक साहित्य निर्मिती स्पर्धेत प्राथमिक शिक्षक गटातून सोलापूर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व केले. त्यांनी तयार केलेल्या 'माझी गणित शाळा' या साहित्यास राज्यात चतुर्थ क्रमांक मिळाला.



राज्यभरातून आलेल्या स्पर्धकांमधून जि.प.शाळेतील शिक्षकाने बनवलेल्या गणित शाळेचे राज्य स्तरावर त्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांचे दैनंदिन अध्यापन प्रभावी व दर्जेदार करणे,तणावमुक्त शालेय वातावरण निर्माण करणे, मूलभूत गणितीय कौशल्य विकसित करणे, विद्यार्थ्यांची स्वयंअध्ययनातील रुची वाढवणे, गणिताच्या अध्ययन निष्पत्ती पूर्ण करणे आणि विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी तयार करणे ही उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवूनगणित शाळा हे साहित्य तयार करण्यात आले आहे. शिक्षक विशाल रेपाळ यांनी पाच वेळा राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात सहभाग घेतला. त्यापैकी तीन वेळा त्यांनी राज्यस्तरीय पारितोषिके प्राप्त केली आहेत. या यशाबद्दल पंढरपूर तालुका गट शिक्षणाधिकारी मारुती लिगाडे, जिल्हा विज्ञान मंडळाचे पदाधिकारी, पेहे केंद्र केंद्रप्रमुख दशरथ मोरे, पेहे, करकंब केंद्र, तालुक्यातील शिक्षकांनी शिक्षक विशाल रेपाळ यांचे अभिनंदन केले.

## ६ फेब्रुवारी रोजी गणेशमूर्ती प्राणप्रतिष्ठापना सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. ३ फेब्रुवारी-**

शिवरत्न गणेश उत्सव मंडळ व सेवाभावी संस्थेच्या वतीने श्री गणेश मूर्ती प्राणप्रतिष्ठापना व कलशारोहण सोहळा, शुक्रवार दिनांक ६ फेब्रुवारी रोजी होणार असून गणेश भक्तांनी बहुसंख्येने उपस्थित राहून सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन अध्यक्ष शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांनी केले.



श्री गणेश मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील व त्रिकालवंदनीय श्री सद्गुरु सदाशिव शिवाचार्य महास्वामीजी यांच्या हस्ते होणारा असून त्यानिमित्त गुरुवारी दि.५ रोजी सकाळी ९.३० वाजता शोभायात्रा निघणार आहे. तसेच दुपारी दोन ते पाच या वेळेत गणेश स्तवन, गणेश पूजन, पुण्याहवाचन, मातृका पूजन, नक्षत्र देवतापूजन, नांदीश्राद्ध, वास्तु शुद्धीकरण प्राण शुद्धीकरण, कंकण बंधन, जलाभिषक जलाधिवास, धान्याधिवास, शैय्याधिवास, मुख्य देवता स्थापन, पीठ पूजन व पीठ स्थापन आदी विविध कार्यक्रम होणार असून सायंकाळी ५:३० वाजता आरती व प्रसाद तर शुक्रवार रोजी सकाळी ७ ते १ वा दरम्यान पिठ देवता पूजन, गणेश स्तवन, अग्नी स्थापन, अग्निपूजन, मुख्य देवता पूजन, अभिषेक, वर्णिदान, अग्निहवन मूर्ती संस्कार हवन यासह मुख्यमूर्ती प्रतिष्ठापना व कलशारोहण पूर्णाहूती होणारा असून दुपारी एक ते चार या वेळात महाआरती व महाप्रसाद होणारा आहे.

## मारहाण व धमकीप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३ फेब्रुवारी-**

शहरातील मंगळवार पेठ परिसरात घरात घुसून मारहाण व धमकी दिल्याची घटना घडली असून, याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

श्याम दत्तात्रय माने (वय ३१, व्यवसाय - मजुरी, रा. मंगळवार पेठ, बार्शी) यांनी दिलेल्या फिर्यादीत नमूद केले आहे की, दि. २ फेब्रुवारी रोजी सकाळी ते घराच्या वरच्या मजल्यावर झोपलेले असताना निलेश कोटकर, साईनाथ कोटकर व एक अनोळखी इसम हे तिघे त्यांच्या घरात जबरदस्तीने प्रवेश करुन हाका मारु लागले. त्यावेळी त्यांच्याआईने विचारणा केली असता, आरोपींनी त्यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. आवाज ऐकून श्याम माने खाली आल्यानंतर निलेश कोटकर याने तुझ्यामुळे आमच्या घराचे बांधकाम थांबले आहे, तू आम्हाला घरपट्टी का मागतोस' असे म्हणत गच्चीला धरुन हाताने मारहाण केली. तसेच घरातील स्वयंपाकासाठी वापरली जाणारी लोखंडी पक्कड उचलून उजव्या हाताच्या मनगटावर प्रहार केला. याचवेळी साईनाथ कोटकर व अनोळखी इसम यांनी हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन त्यांना जमिनीवर ढकलून दिले. या झटापटीत श्याम माने यांच्या डोक्याला मार लागला असून डाव्या पायाच्या अंगठ्याला दुखापत झाली आहे. भांडण सोडविण्यासाठी आलेल्या आईला ढकलून देत शिवीगाळ करण्यात आली. घरातून निघून जाताना आरोपींनी यापुढे आमच्याशी बोललास तर तुला जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. घटनेनंतर श्याम माने यांनी बार्शी शहर पोलीस ठाण्यात हजर राहून तक्रार दिली असून, पोलिसांनी दवाखान्यात उपचारासाठी पाठविले आहे. याप्रकरणी निलेश कोटकर, साईनाथ कोटकर व एका अनोळखी इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु असून, पुढील तपास बार्शी शहर पोलीस करीत आहेत.

## ६६ हजारांचा मका चोरीला; अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा, दि. ३ फेब्रुवारी-**

खोमनाळ येथे शेतातील वस्तीवर ६६ हजार रुपये किंमतीची १८ क्विंटल मका चोरट्याने चोरुन नेल्याचा प्रकार घडला असून या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. यातील फिर्यादी ओंकार पडवळे यांची दि.३० जानेवारी रोजी रात्री १ वाजता शेतातील गट नंबर २०४४/२ मध्ये ठेवलेली ३० गोणी म्हणजे १८ क्विंटल व गणेश इंगळे यांची २५ गोणी म्हणजे १५ क्विंटल असा एकूण ६६ हजारांचा मुद्देमाल चोरट्यांनी चोरुन नेला असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

# जाती पाती तोडेंगे, सारे हिंदू जोडेंगे! समरस हिंदू समर्थ भारत

## अनिरुध्द पंडित; विश्व हिंदू परिषदेचे सामाजिक समरसता अभियान यात्रेचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३ फेब्रुवारी-**

भारताला विश्व गुरु बनविण्यासाठी जातीपातीत भेदाभेद न मानता विश्व हिंदू परिषदेच्या सामाजिक समरसता अभियान यात्रेत समस्त हिंदूंनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन विश्व हिंदू परिषदेचे मुंबई क्षेत्र (महाराष्ट्र/गोवा) संघटनमंत्री अनिरुद्ध तथा अण्णा पंडित यांनी केले.

आगामी काळात भारताला विश्व गुरु बनविण्यासाठी सर्व हिंदू बांधवांनी हिंदू धर्मातील जाती पाती मध्ये भेदाभेद न मानता विश्व हिंदू परिषदेच्या सामाजिक समरसता अभियानाच्या कार्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे प्रतिपादन विश्व हिंदू परिषद मुंबई क्षेत्राचे संघटनमंत्री अनिरुद्ध पंडित यांनी केले आहे. विहिंप प. महाराष्ट्र प्रांत सामाजिक समरसता अभियान यात्रेचा शुभारंभ अक्कलकोट तालुक्यातील सांगवी जवळील किणी मोड लमाणतांडा येथून झाला. प्रारंभी संत सेवालाल महाराज व जगदंबा मातेच्या मूर्तीचे पूजन प्रमुख मान्यवरांच्या हस्ते झाले.

यप्रसंगी प्रमुख पाहुणे विहिंप प. महाराष्ट्र प्रांत अध्यक्ष प्रा. गजानन धरणे, सामाजिक समरसता प्रमुख निखिल कुलकर्णी, विभाग सहमंत्री तथा यात्रा प्रमुख



विजयकुमार पिसे, जिल्हाध्यक्ष अभिमन्यू डोंगरे महाराज, ॲड. संकेत राव, जिल्हाप्रमुख चंद्रकांत कुलकर्णी, संजयकुमार जमादार, जिल्हा सहमंत्री विष्णू जगताप, सहप्रमुख विकास कुलकर्णी, बजरंग दल सहसंयोजक अभय कुलथे, सह संयोजक अनिल कोळी, अक्कलकोट प्रखंड मंत्री मेजर बालाजी राजपूत आणि बजरंग दल संयोजक मदन राठोड आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी लमाण समाजाच्या पारंपारिक रुढी नुसार सेवालाल महाराज व आई जगदंबेच्या मंदिरासमोर होमहवन प्रसादाची आहुती दिली. सामाजिक समरसता अभियानाच्या चित्ररथाचे उद्घाटन प्रा.गजानन धरणे, मुंबई क्षेत्राचे संघटनमंत्री अनिरुद्ध पंडित यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास रामचंद्र राठोड पुजारी, राजु चव्हाण, मेघराज राठोड, चंदु बंदिछोडे, रवि राठोड, रमेश जाधव, बिराप्पा बंदिछोडे, देवेंद्र बंदिछोडे, हरीदास राठोड, सुरेश बंदिछोडे, जालींदर कदम, रविंद्र राठोड, देविदास राठोड, गोपीनाथ चव्हाण कारभारी, बाबु राठोड, निलु राठोड, पिंटू चव्हाण कारभारी, मदनकुमार राठोड, ज्ञानेश्वर पाटील उपस्थित होते. त्यानंतर चित्ररथाचे अक्कलकोट शहरातील बेडर समाजाच्या वतीने श्री मरीआई मंदिरात धर्मराज गुंजले, शिवराज मलवे, सचिन कुर्ले, नागेश मिलगले, सुरज कुर्ले, सुनिता मिलायली, सुगलाबाई मिनगले यांनी स्वागत केले.

आपला जिल्हा

जिल्हा परिषद व पंचायत समितीची

# रणधुमाळी

बुधवार, ४ फेब्रुवारी २०२६





## ▶▶माढा तालुक्यातील राजकारणात ट्विस्ट

# साठे गटाचा 'भाजपा'च्या उमेदवारांना पाठिंबा




**तभा वृत्तसेवा,**
**माढा, दि.३ फेब्रुवारी-**

माढा तालुक्यातील जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीमध्ये मोठा ट्विस्ट निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. माजी आमदार धनाजीराव साठे, नगराध्यक्षा अ‍ॅड.मीनल साठे, दादासाहेब साठे यांनी माढा तालुक्यातील जि.प., पं.स.निवडणुकीत भाजपच्या उमेदवारांना पाठिंबा देण्याचा निर्णय बैठक घेऊन जाहीर केला आहे. येथील जगदाळे मंगल कार्यालयात आयोजित साठे गटाच्या बैठकीत सदर निर्णय घेण्यात आला.

माजी आमदार धनाजीराव साठे याप्रसंगी बोलताना म्हणाले, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका आधीच जाहीर झाल्या असून मतदानही काही दिवसांवर येऊन ठेपले आहे. या निवडणुकीमध्ये कथाकथित नेत्यांनी जी वागणूक दिली आहे. त्या गोष्टीला उत्तर द्यायचे असेल तर तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीतील भाजप व पुरस्कृत उमेदवारला निवडून आणण्यासाठी काम करायचे आहे.

नगराध्यक्षा अ‍ॅड.मीनल साठे म्हणाल्या, साठे गट राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रामाणिकपणे काम केले. जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीमध्ये मला तालुक्याचा प्रभारी म्हणून नियुक्त केले. परंतु दोन्ही राष्ट्रवादी एक झाल्यानंतर निवडणूक प्रक्रियेमध्ये आम्हाला डावलण्यात आले. साठे गटालाही वेगळे ठेवण्यात आले. आम्हाला न पटणाऱ्या गोष्टी घडत होत्या. कार्यकर्त्यांचे काम होण्यासाठी कुठल्याही पदाची गरज नाही. कार्यकर्त्यांच्या इच्छेखातर तिकीट मागितलो होतो. दादासाहेब साठे म्हणाले, १९९७ पासून मी जिल्हा परिषद निवडणूक लढवतोय. कार्यकर्ता टिकला पाहिजे व साठे गट अबाधित राहण्यासाठी ही धडपड होती. आत्ता देखील साठे गटानी भाजपाच्या उमेदवारांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला असून आम्ही व आमचे कार्यकर्ते भाजप परिवारासोबत असून तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीचे सर्व उमेदवार निवडून येण्यासाठी अहोरात्र सक्रियपणे काम करणार आहोत.

याप्रसंगी उपनगराध्यक्षा कल्पना जगदाळे, बी.डी.पाटील, कुर्मदास कारखान्याचे व्हाईस चेअरमन सुधीर पाटील, भालचंद्र पाटील, विजयसिंह पाटील, भाऊ वाघ, सिराज शेख, मधुकर चव्हाण, शंकर नाईकवाडे, बाळासाहेब नाईकवाडे, विठ्ठल शिंदे, नारायण गायकवाड, हरिभाऊ खताळ, प्रताप सिंह कदम, वेदांत साठे, अ‍ॅड.समाधान लटके, पृथ्वीराज सावंत, मुन्ना मोरे, पंडित देशमुख, मीराबाई ठोंबरे, स्वाती गिड्डे, हनुमंत गिड्डे आदी उपस्थित होते.

## भाजपा, मित्रपक्षाचे उमेदवार मातीशी नाळ असणारे : आ. समाधान आवताडे



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.३ फेब्रुवारी-**

भाजपा-महायुती सरकारच्या माध्यमातून गादेगावसह पंढरपूर तालुक्यात रस्ते, पाणीपुरवठा, वीज, शेती यांसह मूलभूत सुविधांच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणावर विकासकामे झालेली आहेत. जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी भाजपा आणि मित्रपक्षांचे उमेदवार हे मातीशी नाळ असणारे आहेत, असे प्रतिपादन आमदार समाधान आवताडे यांनी केले.

सोलापूर जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर तालुक्यातील गादेगाव येथे भारतीय जनता पक्ष व मित्र पक्षाच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित जाहीर सभेत बोलताना ते पुढे म्हणाले, गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि लोकांच्या प्रश्नांशी जोडलेले आणि प्रत्यक्ष काम करणारे लोकप्रतिनिधी निवडून देणे गरजेचे आहे. भाजपा-महायुतीच्या माध्यमातून झालेल्या विविध विकास कामांमुळे नागरिकांचे जीवनमान उंचावण्यास मदत झाली आहे. भाजपा आणि मित्रपक्षाच्या उमेदवारांना मतदानरुपी आशीर्वाद देऊन विजयी करावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

याप्रसंगी माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्यासह गादेगाव व परिसरातील शेतकरी, महिला, युवक व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पिलीव पंचायत समिती गणात जहागिरदार, पुकळे यांच्यात लढत





**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.३ फेब्रुवारी-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव पंचायत समिती गण हा यंदा सर्वसाधारण महिलेसाठी आरक्षित आहे. या पंचायत समिती गणात यंदा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाकडून माजी सभापति संग्रामसिंह जहागिरदार यांच्या धर्मपत्नी यज्ञासेना जहागिरदार विरुद्ध भाजपकडून जलनायक शिवराज पुकळे यांच्या पत्नी नम्रता पुकळे यांच्यात प्रतिष्ठेची व चुरशीची लढत होत आहे.

या पंचायत समिती गणात पिलीव, सुळेवाडी, बचेरी, शिंगोर्णी, कोळेगाव या गावांचा समावेश होतो. या पंचायत समिती गणातील मतदारांची संख्या १९ हजार ९६४ एवढी आहे. पिलीव गावच्या विविध विकास कामांसाठी माजी आमदार रामभाऊ सातपुते यांनी मोठा निधी दिला असून इतर गावातसुदधा विकास कामे झालेली आहेत. भाजपने विकासाच्या मुद्द्यावर मते मागत आहे.

या मतदारसंघात धनगर व मराठा या दोन समाजाची मतदार संख्या निर्णायक आहे. माजी सभापति संग्रामसिंह जहागिरदार यांनी या ठिकाणी जिल्ह्य परिषद सदस्य म्हणून तसेच जिल्ह्य परिषदेचे कृषी व पशुसंवर्धन विभागाचे सभापतिपद भूषविले आहे.शिवराज पुकळे यांनीही दुष्काळी भागातील सुळेवाडी ,बचेरी, शिंगोर्णी या गावांना निरा देवधरचे शेतीला पाणी मिळावे म्हणून मोठा लढा उभारला होता. या ठिकाणी दोन्ही गटाकडून पदयात्रा, कोपरा सभा ,सोशल मिडीयावरून प्रचाराचा अक्षरश धुरळा उडविला आहे.

## जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या मतदानाची तयारी पूर्ण

- ६८ गट, १३६ गणांसाठी २ हजार ७५८ केंद्रांची निर्मिती
- १५ हजार २०० कर्मचारी ६ तारखेला रवाना होणार
- उपजिल्हाधिकारी देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

जिल्ह्यातील ११ तालुक्यांमध्ये जिल्हा परिषदांच्या ६८ गटांसाठी तसेच पंचायत समितीच्या १३६ गणांसाठी मतदान प्रक्रिया पार पडणार असून, त्यासाठी जिल्हाभरात एकूण २ हजार ७५८ मतदान केंद्रांची उभारणी करण्यात आली आहे. मतदान ७ फेब्रुवारी रोजी सकाळी ७.३० वाजल्यापासून होणार असून, या निवडणुकीत २४ लाख ५९ हजार २२७ मतदार आपला मतदानाचा पवित्र हक्क बजावणार आहेत. तर मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी जिल्हा प्रशासनाकडून १५ हजार २०० कर्मचाऱ्यांच्या नेमणुका केल्या असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख यांनी दिली.

मतदारांना सुरक्षित आणि निर्भय वातावरणात मतदान करता यावे यासाठी प्रत्येक केंद्रावर तगडा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. जिल्ह्यात सुमारे दीड हजारांहून अधिक पुरुष व महिला पोलीस तसेच होमगार्ड तैनात करण्यात आले आहेत. शांततेत मतदान प्रक्रिया पार पाडण्यासाठी प्रशासनाने विशेष नियोजन केले आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे ५ फेब्रुवारीला होणारे मतदान पुढे ढकलण्यात आले होते. आता सुधारित वेळापत्रकानुसार ७ फेब्रुवारीला मतदान होणार आहे. मतदानासाठी आयोगाने निवडणूक ओळखपत्र अनिवार्य केले असून, मतदारांनी मतदार ओळखपत्र, आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, पॅन कार्ड, बँक पासबुक किंवा छायाचित्र असलेला कोणताही वैध पुरावा सोबत आणणे आवश्यक आहे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



### २४ लाख ५९ हजार मतदार बजावणार हक्क

जिल्ह्यात एकूण २४ लाख ५९ हजार २२७ मतदार मतदानाचा हक्क बजावणार असून, त्यामध्ये १२ लाख ७७ हजार ०६१ पुरुष, ११ लाख ८२ हजार ०८३ महिला व ८३ इतर मतदारांचा समावेश आहे. प्रशासनाने सर्व मतदारांना निर्भयपणे व मोठ्या संख्येने मतदानात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

### मतदान यंत्रावरील मतपत्रिकांचे रंग

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीतील जिल्हा परिषद गटाची मतपत्रिका पांढऱ्या रंगाची असून, पंचायत समिती गणाची मतपत्रिका गुलाबी रंगाची असणार आहे. दरम्यान, उमेदवारांची संख्या जास्त असल्यास दोन मतदान यंत्रांचा (बियू) वापर करण्यात येणार असल्याची माहिती राज्य निवडणूक आयोगाने कळविली आहे.

| तालुकानिहाय मतदान केंद्रांची संख्या | |
|---|---|
| करमाळा | २४४ |
| माढा | २६९ |
| बार्शी | २५६ |
| उत्तर सोलापूर | ९७ |
| मोहोळ | २२० |
| पंढरपूर | ३०९ |
| माळशिरस | ३६३ |
| सांगोला | २७४ |
| मंगळवेढा | १८९ |
| द. सोलापूर | २४७ |
| अक्कलकोट | २९० |
| एकूण | २७५८ |

**मतदान केंद्रांची निर्मिती जिल्ह्यात केली असून, सर्वांनी लोकशाहीच्या या उत्सवात सहभाग दर्शवून मतदान करावे, असेही आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.**

## चुकीची माहिती दिल्यास कारवाई : बी.आर.माळी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ३ फेब्रुवारी-**

चुकीची माहिती देऊन आदेश रद्द केल्यास कारवाई करण्यात येईल अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी बी.आर.माळी यांनी दिली. जिल्हा परिषद पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी शिक्षकांची नेमणूक केलेली होती. परंतु निवडणूक आदेश आले असताना निवडणूक कर्तव्य टाळून काही शिक्षकांनी दुसऱ्याचा परीक्षा फॉर्म एडिट करून दि.७ फेब्रुवारी ही तारीख बनवली असल्याचे तक्रार येत असल्याची माहिती निवासी नायब तहसीलदार सोमनाथ साळुंखे यांनी दिली.

ज्यांची सीटीईटी परीक्षा दि. ७ फेब्रुवारी रोजी आहे, त्या शिक्षकांनी उत्तर पत्रिका मूळ कार्बन प्रत व प्राचार्यांचे स्वाक्षरीची सत्यप्रत निवडणूक निर्णय अधिकारी बी.आर.माळी यांना सादर करावी. परीक्षा न दिल्यास तसेच फॉर्म एडिट केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी अशी माहिती सहा. निवडणूक निर्णय अधिकारी बाळू भागवत यांनी दिली असल्याची मीडिया नोडल अधिकारी मिलिंद सावंत यांनी सांगितले.

# तुळजापूर तालुक्यात यंदा महायुतीची हवा

- संतोषदादा बोबडे यांचा आत्मविश्वास
- आ. राणादादांच्या माध्यमातून कोट्यवधींची कामे

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

तुळजापूर तालुक्यात भारतीय जनता पार्टी व मित्र पक्षाकडून जिल्हा परिषदेच्या ९ अन् पंचायत समितीच्या १८ जागांवर उमेदवार उभे केले असून, या सर्वच उमेदवारांनी सध्या प्रचारात आघाडी घेतल्याने तुळजापूर तालुक्यात भारतीय जनता पार्टी अन् मित्रपक्षाचीच हवा असल्याचा आत्मविश्वास जिल्हा किसान मोर्चाचे अध्यक्ष तथा सावरगाव गणातील भाजपा उमेदवार संतोषदादा बोबडे यांनी दै. तरुण भारतशी संवाद साधताना आज (दि. ०३) व्यक्त केला.



दरम्यान, या तालुक्यातील विविध घटकांसाठी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी कोट्यवधींची विकासकामे केली आहेत आणि भविष्यातही ते करणार असल्यानेच आम्ही विरोधकांवर टिका न करता मतदारांना विकासकामांसाठीच मते मागत आहोत.

तुळजापूर तालुक्यातील काटी जिल्हा परिषद गटात यंदा दुरंगी सामना होत आहे. तर सावरगाव पंचायत समिती गणातही दुरंगीच लढत भाजपा विरूध्द शिवसेना काँग्रेसमध्ये होत आहे. काटी जिल्हा परिषद गट हा यंदा ओबीसी महिलेसाठी राखीव झाल्याने दोन महिलामधे रंगत वाढली आहे. प्रचारात भारतीय जनता पार्टी अन् महायुतीची आघाडी आहे. होम टु होम प्रचारावर त्यांनी भर दिला आहे. आजपर्यंत राज्य आणि केंद्र सरकारने केलेल्या विकासाची कामे भाजपाकडून मतदारांना समजावून सांगितली जात आहेत. इतकेच नाही तर भविष्यातील विकासाच्या घोषणाही केल्या जात आहेत. यामुळे सध्या भारतीय जनता पार्टीचीच हवा असल्याचा दावा जिल्हा किसान मोर्चाचे अध्यक्ष तथा तुळजापूर पंचायत समितीचे माजी सभापती संतोषदादा बोबडे यांनी केला असला तरी मतदार कोणाच्या पारड्यात जास्तीची मते घालणार? याचा फैसला येत्या ७ तारखेच्या निकालावरच कळणार आहे. दरम्यान, प्रचाराला अवघे दोनच दिवस शिल्लक असल्याने सर्वच पक्षाच्या उमेदवारांनी प्रचाराचा वेग वाढविला असून, शेतकरी, कामगार, व्यापारी व इतर सर्वच घटकांतील नागरिकांच्या भेटी-गाठी घेण्यात उमेदवार व्यस्त असल्याचेच दिसून येत आहे. सकाळी लवकर उठून प्रचार सुरू होतो आणि रात्री १० वाजेपर्यंत कॉर्नर सभा, जाहीर सभा या उमेदवारांच्या चालू असतात. यातूच रॅलीसाठीही हे उमेदवार वेळ देताना दिसत आहेत.

### गणातही दुरंगी सामना

काटी पंचायत समिती गण हा सर्व साधारण पुरषांसाठी खुला झाल्याने इथे भाजपाकडून माजी सरपंच विक्रमसिंह देशमुख तर शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने सुजित हंगरकर लढत आहेत.सावरगाव पंचायत समिती गण सर्व साधारण खुला झाल्याने भाजपा कडून माजी सभापती संतोषदादा बोबडे तर काँगेसकडून शंकर शिंदे हे निवडणूक रिंगणात आहेत. गट व गणामधे दुरंगी लढत होत असल्याने मतदार कुणाला कौल देणार? याकडे लक्ष आहे.

### भाजपाकडून पंचक्रोशीचा करणार कायापालट

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या रणसंग्रामाला सुरूवात झाली असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लाडकी बहीण योजना, शेतकरी सन्मान निधी योजना, पिकविमा, कर्जमाफी अशा विविध योजनांचा पाठपुरावा सुरूच ठेवला आहे. इतरही घटकांसाठी अनेक योजना या सरकारने राबविल्या आहेत. या योजना जिल्ह्यात राबविण्यासाठी आमदार राणादादा सतत पाठपुरावा करतात. केंद्र आणि राज्य सरकारकडून राज्यात अनेक योजना सुरू आहेत; विकासाची कामे सुरू आहेत. या पंचक्रोशीलाही मोठा लाभ मिळाला आहे; भविष्यातही आम्ही लाभ देणार आहोत.

## पंढरपुरातील कार्यकर्त्यांना 'ती' बाब पचनी पडत नव्हती

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३ फेब्रुवारी-**

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत विठ्ठल परिवारामध्ये विभागणी झाली होती. परिवाराचे तीन विभाग पडले होते. माढ्याचे आमदार अभिजीत पाटील आणि विठ्ठल कारखान्याचे माजी चेअरमन भगीरथ भालके यांनी वेगवेगळे उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उतरविले होते. परंतु पंढरपूर तालुक्यातील कार्यकर्त्यांना ती बाब पचनी पडत नव्हती. त्यामुळे आमदार अभिजीत पाटील व भगीरथ भालके यांनी एकत्रित येत निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत, असे भंडीशेगाव येथे झालेल्या सभेत सांगण्यात आले.



आमदार अभिजीत पाटील याप्रसंगी बोलताना म्हणाले, वाखरी जिल्हा परिषद गट हा हॉटस्पॉट आणि चर्चेतील आहे. याठिकाणी निवडणूक लढवण्यासाठी अनेकजण इच्छुक होते. मात्र घड्याळाचा पंचा गळ्यात घालून कमळ घेतलं. असाही एक प्रकार पहावयास मिळाला आणि याठिकाणी असलेल्या यलमर यांच्यावर अन्याय झाला. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या असतात. परंतु जिल्ह्याचे पालकमंत्री कोणत्याही गल्लीबोळात फिरून या निवडणुकांमध्येही लक्ष घालत आहेत. आमच्यासाठी पालकमंत्र्यांना यावं लागतं हीच आमच्यासाठी फार मोठी गोष्ट आहे. विठ्ठल कारखान्याचे माजी चेअरमन भगीरथ भालके यांनी सहकार शिरोमणी कारखान्याचे चेअरमन कल्याणराव काळे यांच्या राजकीय कटकारस्थानाचा पाढा वाचताना म्हणाले, केवळ विठ्ठल परिवाराच्या नावाखाली एकत्रित येण्याची भाषा बोलायची आणि वेळ आल्यानंतर वेगळी भूमिका घ्यायची हेच त्यांनी अनेकवेळा केल्याचे आपणास पहावयास मिळाले आहे. स्व.भारत भालके यांच्या निधनानंतर आम्ही आपणाला वडीलधारी या नात्याने कायम सन्मान देत आलो होतो. आपण ठरलेली भूमिका न स्वीकारता कायम वेगळी भूमिका घेऊन मला अडचणीत आणण्याचा मोठा प्रयत्न केला. मनसेचे नेते दिलीप धोत्रे म्हणाले, पंढरपूर नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये कल्याणराव काळे यांनी आमच्या विरोधात प्रचार केला. आम्ही प्रत्येकाची मूठ बांधण्याचा प्रयत्न करत होतो. यावेळी प्रा.तुकाराम मस्के, तानाजी बागल, दीपक पवार, वर्षाराणी शिंदे, समाधान गाजरे, दत्ता नागणे, सुधाकर सुरवसे, बाळासो बागल, रणजीत बागल, पार्थ सुरवसे, नागेश भोसले, विष्णू बागल, सूर्यकांत बागल, सुभाष गोडसे, संग्राम गायकवाड, साहेबराव नागणे, हनुमंत बागल, चंद्रकांत पाटील, धनंजय काळे, बिभिषण पवार, विठ्ठल गाजरे आदी उपस्थित होते.



# काटगाव गट, तामलवाडी गणात फुलणार कमळ

- भाजपाच्या रॅलीत हजारो नागरिकांचा सहभाग
- युवा नेते यशवंत लोंढे यांचा प्रचारात सक्रीय सहभाग

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३ फेब्रुवारी-**

तुळजापूर तालुक्यातील काटगाव जिल्हा परिषद गटाचे भाजपा महायुतीचे उमेदवार निवृत्ती माळी व तामलवाडी पंचायत समिती गणाच्या उमेदवार मंदाकिनी शिवाजी सावंत या उमेदवारांच्या प्रचारार्थ तामलवाडी गावातून भव्य रॅली काढण्यात आली. या रॅलीला हजारो नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून, या गट व गणात कमळ फुलण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दरम्यान, या गट अन् गणासाठी भाजपाचे युवा नेते तथा बाजार समिती सदस्य यशवंत अण्णा लोंढे यांचा प्रचारात मोठा सहभाग दिसून येत आहे.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या रणसंग्रामाला सुरूवात झाली असून, मंदाकिनी सावंत आणि निवृत्ती माळी हे उमेदवार व त्यांचे कार्यकर्ते पायाला भिंगरी लावून गावे पिंजून काढत आहेत. डोअर टु डोअर प्रचारावर त्यांचा भर आहे. या उमेदवारांची तामलवाडी येथे दि.०२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ग्रामदैवत श्री विष्णू महादेव, श्री हनुमान, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरामध्ये मान्यवरांच्या उपस्थितीत श्रीफळ वाढवून प्रचाराचा श्रीगणेशा केला. यावेळी निवृत्ती माळी व मंदाकिनी सावंत या भाजपा महायुतीच्या उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करण्याचे मान्यवरांनी आवाहन केले.

### विकासाचा वादा आ. राणादादाः कंदले

आमदार राणाजगजितसिंह पाटील हे अहोरात्र तुळजापूर तालुक्यातील जनतेसाठी काम करत आहेत. शेतकऱ्यांचे प्रश्न शासन दरबारी माडुन ते सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतात. जिल्ह्यासह तालुक्यातील शेतकऱ्यांना त्यांच्या विम्याचे हक्काचे पैसे मिळवून देण्यासाठी ते सतत प्रयत्नशील राहतात त्यामुळेच शेतकऱ्यांना विमा मिळत असल्याने विकासाचा वादा म्हणजे राणादादा असे आनंद कंदले यांनी सांगितले.

### आम्ही विकासाचे राजकारण करतो

देवाभाऊंनी लाडकी बहीण योजना, शेतकरी सन्मान योजना अनेक योजनांचा पाठपुरावा सुरूच ठेवला आहे. इतरही घटकांसाठी अनेक योजना या सरकारने राबविल्या आहेत. या योजना जिल्ह्यात राबविण्यासाठी आमदार राणादादा सतत पाठपुरावा करतात. केंद्र आणि राज्य सरकारकडून राज्यात अनेक योजना सुरू आहेत; विकासाची कामे सुरू आहेत. या पंचक्रोशीलाही मोठा लाभ मिळाला आहे; भविष्यातही आम्ही लाभ देणार आहोत. यामुळे आम्ही विरोधकांवर टिका न करता फक्त विकासाचे राजकारण करतो अन् विकासालाच मते मागतो असे विचार युवा नेते यशवंत लोंढे, बसवणप्पा मसुते व इतर नेत्यांनी मांडले.

### या मान्यवरांची सभेला उपस्थिती

यावेळी भाजपा जेष्ठ नेते बसवणप्पा मसुते, युवा नेते यशवंत लोंढे, शिवाजी सावंत (माजी सैनिक), अब्बास पटेल, मल्लिकार्जुन मसुते, उपसरपंच सुधीर पाटील, दत्तात्रय वडणे, ज्ञानेश्वर माळी, बापुसाहेब पाटील, रविकांत गुरव, सोपान सावंत, कबीर पाटील, लक्ष्मण करंडे, मारुती रोकडे, ज्ञानेश्वर पाटील, तमीज पटेल, आनंदा रणसुरे, भास्कर पवार, शहाजी लोंढे, इंद्रजित घोटकर, सोपान सावंत आदीसह काटगाव, सुरतगाव, देवकुरळी, पिंपळा खुर्द व तामलवाडी येथील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.